RNI No. MAHBIL /2009/35529

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग एक–कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक २५] गुरुवार ते बुधवार, जून १८-२४, २०२६/ज्येष्ठ २८-आषाढ ३, शके १९४८ [पृष्ठे ४८ किंमत : रुपये १४.००

प्राधिकृत प्रकाशन

शासकीय अधिसूचना, नेमणूका इत्यादी

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर यांजकडून

आदेश

क्रमांक वि.शा./सुरक्षा शाखा/मनाई आदेश/०२/२०२६.—ज्याअर्थी, ठाणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था भंग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मानवी जीवनाच्या सुरक्षिततेला व सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होण्याचा गंभीर धोका निर्माण होऊ शकतो.

२. देशातील विविध ठिकाणी अतिरेकी/दहशतवादी, असामाजिक घटक यांनी रिमोटद्वारे नियंत्रित होणाऱ्या ड्रोन अथवा हवाई क्षेपणास्त्राद्वारे हल्ले केल्याच्या घटना घडल्या आहेत. प्राप्त परिस्थितीमध्ये ठाणे शहर पोलीस आयुक्तांच्या नियंत्रणाखाली असलेल्या भागात अतिरेकी/दहशतवादी असामाजिक घटक हे पॅरा-ग्लाइडर्स, रिमोटद्वारे कंट्रोल होणाऱ्या ड्रोन अथवा मायक्रो लाईट एअरक्राफ्टचा वापर करुन हल्ला करु शकतात, अशा कारवायांवर आळा घालणे आवश्यक आहे. हे प्रकार रोखण्यासाठी तातडीने कारवाई करणे आवश्यक असल्याबाबत माझी खात्री झाली आहे.

३. त्याअर्थी, मी स्वप्निल राठोड, सहायक पोलीस आयुक्त, वि.शा., तथा अति. कार्य पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर, आम्हांस शासनाच्या दिनांक १ एप्रिल १९७४ चे अधिसूचनेद्वारे ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३(२) अन्वये विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणून प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून ठाणे पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्याच्या हद्दीत रिमोटद्वारे कंट्रोल होणारे ड्रोन, नियंत्रित हवाई क्षेपणास्त्र, पॅराग्लायडर्स किंवा मायक्रो लाईट एअर क्राफ्ट यांच्या उड्डाण क्रियाकलापांना सक्षम प्राधिकाऱ्याच्या "पुर्व परवानगी" शिवाय ठाणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात दिनांक ३ मे २०२६ रोजी ००-०१ वा. पासून ते दिनांक ४ मे २०२६ रोजीचे दुपारी १२-०० वा. पर्यंत १२ तासाचे कालावधीमध्ये बंदी करीत आहे. परंतु रिमोट कंट्रोल मायक्रो लाईट एअरक्राफ्ट ड्रोनद्वारे हवाई निगराणी करण्यास ठाणे शहर पोलिसांना परवानगी राहील.

४. सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २२३ (अ) (ब) अन्वये शिक्षेस पात्र राहील.

५. संबंधितांना आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रारसमाध्यमे, पोलीस स्टेशन, सहा. पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पो.उप आयुक्त कार्यालय, ठाणे शहर यांचे नोटीस बोर्डावर नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

६. सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी पारित केलेला आहे.

स्वप्निल राठोड,
सहायक पोलीस आयुक्त, वि.शा.,
तथा अति. कार्य.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांजकडून
अधिसूचना

क्रमांक उविअ/मुंपउ/एलएक्यू/एसआर-२७/२०२०.—ज्याअर्थी नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन अधिसूचना क्रमांक टीपीबी-४३१२/३२३/प्र.क्र.२३/२०१३/नवि-११, दिनांक १३ मे २०१३ व दिनांक ३ जून २०१६ अन्वये सोबतच्या अनुसूचीत नमूद केलेली जमीन वाहनतळ या सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित केली आहे.

आणि ज्याअर्थी बृहन्मुंबई महानगरपालिका (यापुढे उक्त संपादन संस्था म्हणून संबोधिलेले) यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे " उक्त महाराष्ट्र अधिनियम " म्हणून संबोधलेला) सह भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये भूसंपादनाचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १५१, पोट-कलम (१) खाली काढलेल्या अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१७५/५१०६/युडी-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वये मंजूर विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी निर्दिष्टीत करण्यात आलेल्या जमिनीबाबतच्या उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६(१)(२) व (४) खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी आवश्यक असल्याबाबतची जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांची खात्री झाली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या संपादनापोटी द्यावयाच्या नुकसानभरपाईची रक्कम संपूर्णपणे बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी प्रदान करावयाची आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगरविकास विभागाकडील महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना (दुसरी दुरुस्ती) अध्यादेश, २०१५ **शासन राजपत्र** दिनांक २९ ऑगस्ट २०१५ मध्ये नमूदनुसार प्रादेशिक आराखडा, विकास आराखडा किंवा नगररचना योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक, आरक्षित अथवा निश्चित केलेल्या जमिनीसाठी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३ म्हणून संबोधिलेला) मधील कलम ४ ते १५ मधील नमूद कार्यपद्धती लागू ठरणार नाही.

आणि ज्याअर्थी, शासनाने प्रदान केलेल्या शक्तीनुसार आणि उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ च्या पोट-कलम (२) व (४) सह उक्त संपादन अधिनियम, २०१३ च्या कलम १९ च्या पोट-कलम (१) अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा असे घोषित करतात की, उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत.

आणि ज्याअर्थी, उक्त संपादन अधिनियम, २०१३ च्या कलम ३, खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर, प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांना पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची

गाव गोराई, तालुक बोरीवली, जिल्हा मुंबई उपनगर

अ. क्र.	नगर भूमापन क्रमांक	आवश्यक जमिनीचे क्षेत्र (चौ.मी.)
१	१९१५ पै	११४.००
२	१९१६ पै	३९७१.००
३	१९१९ पै	१६७३.००
४	१९२० पै	२६८.००
५	१९२१ पै	३३४९.००
६	१९२२	१६२.७०
७	१९२६ पै	१७५.००
	एकूण	**९७१२.७०**

सार्वजनिक प्रयोजन.—वाहनतळ या सार्वजनिक प्रयोजनासाठी.

सौरभ कटियार,
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.

मुंबई,
दिनांक २९ मे २०२६.

BY THE COLLECTOR, MUMBAI SUBURBAN DISTRICT

NOTIFICATION

No.SDO/MWS/LAQ/SR-27/2020.— Whereas, the Urban Development Department, Government of Maharashtra, *vide* Government Notifications No. TPB-4312/323/C.R.23/2013/UD-11, dated 13th May 2013 and 3rd June 2016, has reserved the land specified in the accompanying Schedule for the public purpose of a parking lot.

And whereas, the Brihanmumbai Municipal Corporation (hereinafter referred to as " the said Acquiring Body ") has submitted a proposal for land acquisition to the State Government under the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013, and the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Maharashtra Act ").

And whereas, pursuant to Notification No. TPS.2175/5106/UD-7, dated March 3, 1979—issued by the Urban Development and Public Health Department of the Government of Maharashtra under Section 151, sub-section *(1)* of the aforesaid Maharashtra Act—the powers exercisable by the State Government under Section 126(1), (2), and (4) of the said Act, in respect of lands designated for public purposes within the sanctioned Development Plan, have been delegated to the District Collector

And whereas, the Collector, Mumbai Suburban District, is satisfied that the aforesaid lands are required for the said public purpose.

And whereas, the entire amount of compensation payable for the acquisition of the said land is to be paid by the Brihanmumbai Municipal Corporation.

And whereas, pursuant to the Maharashtra Regional and Town Planning (Second Amendment) Ordinance, 2015—issued by the Urban Development Department of the Government and published in the *Government Gazette* dated August 29, 2015—the procedures stipulated in Sections 4 to 15 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (hereinafter referred to as " the said Land Acquisition Act, 2013 ") shall not apply to land that has been reserved, designated, or earmarked for a public purpose within a Regional Plan, Development Plan, or Town Planning Scheme.

And whereas, in exercise of the powers conferred by the Government, and pursuant to sub-sections *(2)* and *(4)* of Section 126 of the aforesaid Maharashtra Act, read with sub-section *(1)* of Section 19 of the aforesaid Acquisition Act, 2013, the Collector, Mumbai Suburban District, hereby declares that the said lands are required for the aforesaid public purpose.

And whereas, the Collector—being the Appropriate Government under Section 3, Clause (g) of the aforesaid Act of 2013-hereby designates the Sub-Divisional Officer, Mumbai Western Suburb, Administrative Building, 9th Floor, Bandra (East), Mumbai-400 051, to discharge the functions of the Collector under the said Act.

Schedule

Village Gorai, Taluka Borivali, District Mumbai Suburban

Sr No.	City Surbay No.	Area of Land to be Acquired in Sq.Mtr.
1	1915 (pt)	114.00
2	1916 (pt)	3971.00
3	1919 (pt)	1673.00
4	1920 (pt)	268.00
5	1921 (pt)	3349.00
6	1922	162.70
7	1926 (pt)	175.00
	Total	**9712.70**

Purpose of Acquisition.—For the public purpose of " Parking "

Mumbai
dated 29th May 2026.

SAURABH KATIYAR,
Collector,
Mumbai Suburban District.

नगरविकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० जून २०२६.

अधिसूचना

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६.

क्रमांक टीपीएस-१२२५/९७०/प्र.क्र.१०६/२५/नवि-१२.—ज्याअर्थी, महाराष्ट्र ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (महा.अधिनियम XXXVII. १९६६) यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे.) च्या कलम ४० च्या उप-कलम (1) मधील खंड (ख) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१२/४७५/प्र.क्र.९८/१२/नवि-१२, दिनांक १० जानेवारी २०१३ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) अन्वये त्यात नमूद केल्याप्रमाणे नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना), (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिसूचित क्षेत्र " असा करण्यात आला आहे.) साठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित (महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व नियंत्रणाखालील कंपनी) (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त महामंडळ " असा करण्यात आला आहे) म्हणजे ' सिडको ' ची विशेष नियोजन प्राधिकरण (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त विशेष नियोजन प्राधिकरण " असा करण्यात आला आहे.) म्हणून नेमणूक केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस १२१५/२४५/प्र.क्र. ३३२/१६//एसएम/नवि-१२, दिनांक २७ एप्रिल २०१७ अन्वये उक्त अधिसूचित क्षेत्राच्या २३ गावासांठीची अंतरीम प्रारुप विकास योजना (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त विकास योजना " असा करण्यात आला आहे.) मंजूर झाली असून ती दिनांक ४ मे २०१७ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१७/स.क्र. २७५०/प्र.क्र.९१/२०१९/नवि-१२, दिनांक १६ सप्टेंबर २०१९ उक्त अधिसूचित क्षेत्राच्या उर्वरीत १५२ गावांची विकास योजना त्याच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीसह भागशः मंजूर केली असून (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त विकास योजना " असा करण्यात आला आहे) ती दिनांक १८ऑक्टोबर २०१९ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम १५४ अन्वये महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील निदेश प्रा. टीपीएस-१७१७/२७५०/प्र.क्र.९१/१९/नवि-१२, दिनांक ६जानेवारी २०२० अन्वये १५२ गावांसाठी मंजूर झालेली विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त विकास नियंत्रण नियमावली " असा करण्यात आला आहे.) उर्वरीत २३ गावांसाठी तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८१६/प्र.क्र.३६८/१६/(भाग-१)/वियो-आयटीपी/नवि-१३, दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१कक)(ग) अन्वये एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाचे विनियम विशेष नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्रासाठी मंजूर केले आहेत (यापुढे जिचा उल्लेख " उक्त नियमावली " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, मे.वाधवा कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.(यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त प्रकल्प प्रवर्तक " असा करण्यात आला आहे) यांचे विनंतीस अनुसरुन शासनाने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१४/४५१/प्र.क्र.७०/१५/नवि-१२, दिनांक २ डिसेंबर २०१५अन्वये सदर अधिसुचनेसोबत जोडलेल्या अनुसुची "अ" मध्ये नमूद मौजे वारदोली, ता. पनवेल, जि. रायगड येथील सुमारे ५७.४५४ हे.आर. क्षेत्र विशेष नगर वसाहत प्रकल्प म्हणून अधिसुचित करुन त्यास त्यामध्ये नमूद अटी व शर्तीसापेक्ष लोकेशनल क्लिअरंन्स प्रदान केले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिसुचित विशेष नगर वसाहत " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचित विशेष नगर वसाहतीचे प्रकल्पाचे क्षेत्र " नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसुचित क्षेत्र (नैना) या विशेष नियोजन प्राधिकरणाच्या हद्दीत येत असल्याने, उक्त प्राधिकरणाने पत्र क्र.१६२, दिनांक २० मे २०१९ अन्वये उक्त अधिसुचित क्षेत्रास एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पानुसार सुधारीत बृहत आराखडयास काही अटी व शर्तीसापेक्ष मंजूरी दिली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प " असा केला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास नियंत्रण नियमावली मध्ये एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाकरिताची उक्त नियमावली समाविष्ट आहेत (यापुढे जिचा उल्लेख " उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प विकासाकरिताची नियमावली " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रकल्प प्रवर्तकाच्या विनंतीस अनुसरुन, उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प विकासाकरिताच्या नियमावलीमधील नियम क्र.४.५ मधील तरतुदीनुसार संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अधिसूचना क्र.वि.यो.नैना/ मौजे वारदोली, ता.पनवेल/ए.न.प्र./प्र.क्र.६४/२१/टिपीव्ही-३/५१४, दिनांक २७ जानेवारी २०२२ अन्वये सदर अधिसुचनेसोबत जोडलेल्या "अनुसूची-अ" मध्ये नमूद केलेल्या मौजे वारदोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील सुमारे २.५८९ हे.आर.अतिरीक्त क्षेत्र एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रामध्ये अंतर्भूत करण्यास मान्यता दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रकल्प प्रवर्तकाच्या विनंतीस अनुसरुन उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प विकासाकरिताच्या नियमावलीमधील नियम क्र.४.५ मधील तरतुदीनुसार संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी अधिसूचना क्र.वि.यो.नैना/ मौ.वारदोली व भेरले, ता.पनवेल/ए.न.प्र./ प्र.क.६४/२१/टिपीव्ही-३/२४७४, दिनांक १२ मे २०२२ अन्वये सदर अधिसुचनेसोबत जोडलेल्या अनुसुची-अ मध्ये नमूद केलेल्या मौजे वारदोली व भेरले, ता. पनवेल, जि. रायगड येथील आणखी सुमारे २६.१३२ हे.आर.अतिरीक्त क्षेत्र एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रामध्ये अंतर्भूत करण्यास मान्यता दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका व त्यामध्ये नमूद इतर प्राधिकरणे वगळून उर्वरीत सर्व नियोजन प्राधिकरण, विशेष नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्राकरीता उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (युडीसीपीआर) (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त युडीसीपीआर " असा करण्यात आला आहे) शासनाने उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार शासन अधिसुचना क्रमांक टीपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/वियोवप्रायो/ कलम ३७(१कक)(ग) व कलम २०(४)/नवि-१३, दिनांक २ डिसेंबर २०२० अन्वये मंजूर केली असून, ती दिनांक ३ डिसेंबर २०२० पासून अंमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त युडीसीपीआर मध्ये प्रकरण क्र.१४ मध्ये विशेष योजना (Special Schemes) बाबतची नियमावली असून विनियम क्र.१४.१ हे एकात्मिकृत नगर वसाहतीची नियमावली आहे. आणि सदर नियमावलीमध्ये शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१कक)(ग) व कलम २०(४) अन्वये अधिसुचना क्रमांक टीपीएस-१८२१/४५२/ प्र.क्र.१०५/२०२२/(भाग-२)/नवि-१३, दिनांक ५ सप्टेंबर २०२४ अन्वये फेरबदल मंजूर केले असून, सदरची नियमावली उक्त विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रास लागू आहेत. (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त नियमावली " असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, आता उक्त प्रकल्प प्रवर्तक यांनी दिनांक २० सप्टेंबर २०२४ व दिनांक ११ ऑगस्ट २०२५ च्या पत्रान्वये विकास योजना रस्ता आरक्षणात असलेले क्षेत्र व बांधकाम योग्य नसलेले भूखंड असे एकूण १६.२८४ हे.क्षेत्र उक्त प्रकल्प क्षेत्रामधून वगळण्याची आणि सुमारे ६.४९ हेक्टर अतिरीक्त क्षेत्र उक्त प्रकल्प क्षेत्रामध्ये अंतर्भूत करण्याची विनंती शासनास केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रामध्ये अंतर्भूत करावयाचे, क्षेत्र उक्त विकास योजनेनुसार "प्रामुख्याने रहिवास" या वापर विभागात असून, आ.क्र.३६३- इलेक्ट्रीक सब स्टेशन व २४.०० मी. तसेच ३०.०० मी.रुंद विकास योजना रस्त्याने बाधित होत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीमधील विनियम १४.१.१.४ (ii) नुसार एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या छाननी करणेकरीता, त्यावर संनियत्रण ठेवणेकरिता तसेच प्रकल्पाच्या पुनर्विलोकनाकरीता शासनाने गठीत केलेल्या उच्चाधिकार समितीने उक्त प्रकल्प प्रवर्तकांची उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रामध्ये अंतर्भूत करण्याच्या अतिरीक्त क्षेत्रास व वगळण्याच्या प्रस्तावास दिनांक ३० सप्टेंबर २०२४ व दिनांक ४ सप्टेंबर २०२५ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावली मधील नियम क्र.१४.१.१.४ (v)नुसार संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रामध्ये एकूण क्षेत्राच्या ५० टक्के पर्यंत क्षेत्र एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षैत्रामध्ये अंतर्भूत करण्याची अथ्वा वगळण्याची तरतूद आहे आणि संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी यापुर्वीच एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प विकासाकरीताच्या तत्कालीन नियमावलीमधील नियम क्र.४.५ मधील तरतुदीनुसार शासनाने दिनांक २ डिसेंबर २०१५ च्या अधिसुचनेन्वये एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाकरिता प्रदान केलेल्या लोकेशनल क्लिअरंन्स अंतर्गतच्या एकूण क्षेत्राच्या सुमारे ५०टक्के अतिरीक्त क्षेत्र अंतर्भूत करण्यास मान्यता दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, या अधिसुचनेन्वये उक्त प्रकल्प क्षेत्रामध्ये अंतर्भूत करावयाच्या व वगळावयाच्या क्षेत्रासंदर्भात उक्त प्रकल्प प्रवर्तक यांनी उक्त नियमावलीमधील नियम क्र.१४.१.१.४४ (ii) (आय) नुसार प्रक्रिया शुल्क रुपये १,९५,५००/- (अक्षरी रुपये एक लाख पंच्याण्णव हजार पाचशे फक्त) चा भरणा चलन क्र. MH003003874202627M, दिनांक २१ मे २०२६ अन्वये सहायक संचालक नगररचना, रायगड –अलिबाग शाखा यांच्याकडे केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये समाविष्ट करावयाच्या उक्त वाढीव जमिनीचे क्षेत्र उक्त अधिनियमाच्या कलम ४४ चे पोट-कलम (२) नुसार उक्त अधिसुचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाचे उक्त वाढीव क्षेत्र उक्त विकास योजना नकाशावर निदेशित करणे व वगळावयाचे क्षेत्र निर्देशानमधून वगळणे आवश्यक आहे.

त्याअर्थी आता, उक्त अधिनियमाच्या कलम ४४(२) मधील तरतुदीनुसार व अन्य तरतुदीनुसार प्राप्त अधिकारान्वये शासन याद्वारे यासोबत जोडलेल्या " अनुसुची-अ" मध्ये सविस्तरणे नमूद केलेले मौ.वारदोली, ता. पनवेल, जि. रायगड येथील सुमारे ६.४८-६० हे.आर. क्षेत्र उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षैत्रात अंतर्भूत करुन ते एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाअंतर्गतचे क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे तसेच यासोबत जोडलेल्या "अनुसुची-ब" मध्ये सविस्तरपणे नमूद केलेले मौजे वारदोली व भेरले, ता.पनवेल, जि.रायगड येथील सुमारे १६.३३-९७ हे.आर.क्षेत्र उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रामधून वगळून एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्राची हद्द खालील अटी व शर्तीसापेक्ष सुधारीत करण्यात येत आहे.

अटी व शर्ती :–

(I) मालकी हक्कासंबंधित :–

(१) उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाखालील क्षेत्रांसह उक्त वाढीव जमिनीचे सर्व मालकी / विकसनहक्क उक्त प्रकल्प प्रवर्तकांकडे असणे आवश्यक राहील. उद्देश पत्राकरिता अर्ज करताना नोंदणीकृत सामंजस्य कराराची प्रत, संयुक्त उपक्रमाची नोंदणीकृत कागदपत्रे, मूळ मोजणी नकाशे, मालकी हक्क, विकास हक्क सिद्ध करणाऱ्या कागदपत्रांच्या मूळ प्रमाणित प्रती संबंधित प्राधिकरणाकडे सादर करणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

(२) उप अधीक्षक, भूमी अभिलेख यांच्याकडून देण्यात आलेले अधिकृत मोजणी नकाशे उपलब्ध झाल्यानंतर प्रस्तावाअंतर्गत समाविष्ट करावयाच्या भागशः जमिनी उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पात अंतर्भूत करणे आवश्यक आहे. जर उक्त वाढीव जमिनी उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पांतर्गतच्या अशा जमिनींशी सलग राहत नसतील तर अशा जमिनीचे क्षेत्र उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रातून वगळण्यात यावे व अशा क्षेत्रात एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प राबविता येणार नाही.

(३) बृहत आराखड्यास अंतीम मंजुरी देण्यापूर्वी उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये अंतर्भूत नवीन शर्तीच्या जमिनीसंदर्भाने आवश्यक ती कार्यवाही जिल्हाधिकारी, रायगड यांनी करणेची आहे.

(४) बृहत आराखड्यास अंतिम मंजुरी देण्यापूर्वी उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पांतर्भूत जमिनीच्या ७/१२ उताऱ्यांवरील इतर हक्क स्तंभात नमूद बँकेचे भार व नावे संदर्भात जिल्हाधिकारी, रायगड यांनी पडताळणी करावी व नियमानुसार आवश्यक तो कार्यवाही करावी.

(५) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रात समाविष्ट जागेच्या मालकी हक्कासंदर्भात कोणतेही दस्तऐवज खोटे असल्याचे भविष्यात उघडकीस आल्यास किंवा उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर बसाहत प्रकल्पाबाबत भविष्यात न्यायालयीन वाद उद्भवल्यास त्याबाबत स्वतःच्या जबाबदारी व खर्चाने उपाय योजना करण्याची सर्वस्वी जबाबदारी उक्त प्रकल्प प्रवर्तकांची राहील, अशा परिस्थितीत अशा जमिनीसाठी देण्यात आलेले स्थानिय मंजुरी रदद समजण्यात येईल.

(६) एकात्मिकृत नगर वसाहतीच्या नियमावलीमधील खंड १४.१.१.४(ii) (f) मधील तरतूदीनुसार संबंधित वन अधिकारी यांचे प्रमाणपत्र, खंड १४.१.१.४(ii) (h) मधील तरतुदीनुसार संचालक पुरातत्व विभाग यांचे प्रमाणपत्र आणि खंड १४.१.१.४४ (ii) (d) मधील तरतुदीनुसार जलसंधारण विभागाकडून ना-हरकत दाखला प्राप्त करुन घेवून तो लेटर ऑफ इंटेटपुर्वी जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे सादर करणे प्रकल्प प्रवर्तक यांचेवर बंधनकारक राहील.

(II) पर्यावरण व इतर आनुषंगिक बाबी :–

(१) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रात समाविष्ट करावयाच्या जमिनीमंध्ये कोणतेही विकास / बांधकाम हाती घेणेपूर्वी केंद्र शासनाच्या पर्यावरण, बने आणि हवामान बदल मंत्रालय आणि योग्य त्या प्राधिकरणाची पर्यावरणीय मंजुरी (Environmental Clearance) घेणे आवश्यक राहील. तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाकडील पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन अधिनियम, १९८६ अंतर्गत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचनेमधील अटी व शर्तीचे पालन करणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

(२) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर बसाहत प्रकल्पामधील घनकचऱ्याची आणि सांडपाण्याची विल्हेवाट सुरक्षितपणे लावण्यासाठी योग्य ती व्यवस्था उक्त प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांच्या जबाबदारीवर व स्वखर्चाने आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने ठरविलेल्या निकषाप्रमाणे व तसेच त्यासंबंधीच्या अधिनियमातील तरतुदी व नियमानुसार करणे आवश्यक राहील.

(३) राज्य शासनाचे जलसंपदा विभाग व अन्य संबंधित विभाग वेळोवेळी विहीत करतील, त्या अटी व शर्तीचे पालन करणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील. उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर बसाहत प्रकल्प क्षेत्रातून विद्यमान पाण्याचे स्त्रोत / नाल्याचा प्रवाह असल्यास तो बंद करता येणार नाही.

(४) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या विकासाकामी उक्त नियमावलीमधील विनियम क्र. १४.१.१.१०(v)(a) नुसार पाणीपुरवठा उक्त प्रकल्प प्रर्वतकांनी त्यांच्या स्वखर्चाने व जबाबदारीने पुरविणे आवश्यक राहील. जलसंपदा विभागाकडून यानुषंगाने वेळोवेळी दिलेल्या अटीचे पालन करणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

(५) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या विकासाकामी उक्त नियमावलीतील विनियम क्र.१४.१.१.१०(v)(c) नुसार वीज पुरवठा उक्त प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांच्या स्वखर्चाने व जबाबदारीवर पुरविणे आवश्यक राहील. तसेच उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प विकासाकरीताच्या नियमावलीतील विनियम क्र. १४.१.१.६ नुसार उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाचा बृहत आराखडा मंजूर करणेपूर्वी संबंधित प्राधिकरणाने उक्त प्रकल्प प्रवर्तकांकडून वीज पुरवठा करणाऱ्या कंपनीकडून उक्त प्रकल्पाच्या संपूर्ण क्षेत्राकरिता आवश्यक परवानगी आणि तसेच वीज पुरवठ्याची दृढवचनबद्धता (Firm Commitment of electricity supply for the entire integrated township from the power supply company) प्राप्त करणे आवश्यक राहील.

(III) विकासासंबंधाने :–

(१) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्राने वेढल्या गेलेल्या अन्य खाजगी व्यक्तिच्या जमिनीसाठी नियमावलीनुसार आवश्यक परंतु किमान १२.०० मी. रुंदीचा पोचमार्ग विनामोबदला उपलब्ध करून देणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

(२) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्राच्या जमिनीमधून जाणाऱ्या विद्यमान सार्वजनिक रस्त्यांच्या वहिवाटीचे हक्क अबाधित ठेवणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

(३) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रांमधील ओहोळ / नाल्यावर संबंधीत विभागाच्या परवानगीने सी.डी. वर्क करणे आणि उक्त प्रकल्प क्षेत्रामध्ये अंतर्भूत नदी, नाले, कॅनाल, तलाव आणि इतर जलस्त्रोतापासून उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प विकासाकरिताच्या नियमावलीनुसार आवश्यक ते अंतर ठेवणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

(४) विकास योजना नकाशावर विशेषतः दर्शविले असले अथवा नसले तरीही अधिकृत कंटूर नकाशा नुसार १:५ किंवा त्यापेक्षा जास्त तीव्र उताराचे क्षेत्रावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम अनुज्ञेय नाही. तसेच या क्षेत्रामध्ये जमिनीची खोदाई / सपाटीकरण / भराव, इ. विकास कार्य अनुज्ञेय नाही.

(५) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये सामाविष्ट होणाऱ्या लोकसंख्येसाठी नियमानुसार आवश्यक असणारी मंजूर विकास योजनेनुसार सार्वजनिक प्रयोजनासाठीची आरक्षणे व रस्ते विकसित करून सर्वसामान्य जनतेसाठी उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील आणि तसेच मूलभूत सुविधा यासाठी उक्त प्रकल्पाच्या क्षेत्रामध्ये सुयोग्य स्थानी नियोजन आणि निश्चित करून ती उक्त प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांच्या स्वखर्चाने विकसित करणे बंधनकारक राहील.

(IV) इतर अटी व शर्ती–

(१) या अधिसुचनेमध्ये नमूद अटींसह शासन नगरविकास विभागाची दिनांक २ डिसेंबर २०१५ रोजीच्या तसेच संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक २७ जानेवारी २०२२ व दिनांक १२ मे २०२२ रोजीच्या अधिसुचनेमधील नमूद अटी व शर्तीचे पालन करणे प्रकल्प प्रवर्तकास बंधनकारक राहतील.

(२) उक्त प्रकल्प प्रवर्तकांकडून अटी/शर्तीचा भंग झाल्यास या अधिसूचनेद्वारे प्रदान करण्यात आलेली स्थानीय मंजुरी रद्द करण्याचा अधिकार शासनाकडे राखून ठेवण्यात येत आहे.

(३) या प्रकरणी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियम क्र.१४.१.१.७(v) Share of Local / Planning Authority मुसारच्या तरतुदी लागू राहतील.

२. सदर एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये अंतर्भूत केलेल्या जमिनींचा तपशील अनुसुची-अ, एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामधून वगळलेल्या जमिनींचा तपशील अनुसुची-ब, सुधारीत अधिसुचित केलेल्या एकूण क्षेत्राबाबतचा तपशील अनुसुची-क आणि एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाची सुधारीत हद्द दर्शविणारा नकाशा अनुसुची-ड यासोबत जोडला आहे.

३. उक्त प्रकल्प क्षेत्रामध्ये अंतर्भूत केलेल्या उक्त वाढीव जमिनींचा व वगळलेल्या जमिनींचा तपशील तसेच सुधारीत हद्द दर्शविणारा नकाशा अनुक्रमे अनुसुची-अ, अनुसुची-ब, अनुसुची-क व अनुसुची-ड सर्वसामान्य नागरिकांच्या अवलोकनार्थ कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत खालील कार्यालयात एक महिन्यांच्या कालावधीकरीता उपलब्ध ठेवण्यात यावा.

(१) व्यवस्थापकिय संचालक, सिडको (नैना), नवी मुंबई.
(२) जिल्हाधिकारी, रायगड.
(३) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई.
(४) सहायक संचालक नगररचना, रायगड-अलिबाग शाखा, जि. रायगड.

"अनुसुची–अ"

शासन अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२२५/९७०/प्र.क्र.१०६/२५/नवि-१२,
दिनांक १० जून २०२६ सोबतचे सहपत्र.

एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामधून मौजे वारदोली, ता. पनवेल, जि. रायगड येथील अंतर्भूत करण्यात आलेल्या जमिनींचा तपशिल		
अ.क्र.	**सर्व्हे / हिस्सा नं.**	**क्षेत्र (चौ.मी.)**
१	४८/१	४८००.००
२	४८/३	५१०.००
३	४८/४	२२३०.००
४	४८/५	२२३०.००
५	४८/७	८६०.००
६	६५/१/अे	१५४२०.००
७	६५/१/बी	२०००.००
८	६५/२/बी	६४८०.००
९	६६/१/२	२५६०.००
१०	६५/२/अे	१२९५०.००
११	६५/३	१२९५०.००
१२	५१/३	१८००.००
एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये अंतर्भूत करण्यात आलेले क्षेत्र		**अंदाजे ६४८६०.०० चौ.मी. ६-४८-६० हे.आर.**

"अनुसुची–ब"

शासन अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२२५/९७०/प्र.क्र.१०६/२५/नवि-१२,
दिनांक १० जून २०२६ सोबतचे सहपत्र.

एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामधून मौजे वारदोली, व भेरले ता. पनवेल, जि. रायगड येथील अंतर्भूत करण्यात आलेल्या जमिनींचा तपशील		
मौजे वारदोली		
अ.क्र.	सर्व्हे / हिस्सा नं.	क्षेत्र (चौ.मी.)
१	४०/२ पै.	१२४७.००
२	४४/१पै.	३२४९.००
३	४५पै.	३७०४.००
४	४६/२/२ पै.	१७२.००
५	५६/१ पै.	१३.००
६	५६/२ पै.	२०१.००
७	५६/३ पै.	९५४.००
८	५६/४ पै.	२६.००
९	५७/१ पै.	२८१.००
१०	५७/३/बी पै.	१३०६.००
११	६०/१ पै.	४५६.००
१२	६०/३ पै.	५९६.००
१३	६०/४ पै.	२०२२.००
१४	६२/१ पै.	५६९.००
१५	६२/२ पै.	२८१७.००
१६	६३/१ पै.	४८११.००
१७	१२३/१ पै.	१४९५.००
१८	१२३/२ पै.	४६२८.००
१९	१२७ पै.	५६१.००
२०	१२८/१ पै.	५.००
२१	१२८/३ पै.	१८६२.००
२२	१२८/७ पै.	२५२३.००
२३	१२८/८ पै.	२२७२.००
२४	१२८/११ पै.	६१०.००
२५	१२८/२० पै.	४९७१.००
२६	१३९/९ पै.	२२११.००
२७	१३१/१० पै.	१४०४.००
२८	१३१/१५ पै	२४.००
२९	१३१/१६ पै	१३००.००
३०	१३१/१८ पै.	१७७०.००

एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामधून मौजे वारदोली, व भेरले ता. पनवेल, जि. रायगड येथील अंतर्भूत करण्यात आलेल्या जमिनींचा तपशील		
मौजे वारदोली		
अ.क्र.	सर्व्हे / हिस्सा नं.	क्षेत्र (चौ.मी.)
३१	१३१/१९ पै.	२०३९.००
३२	१३१/२० पै.	४८१.००
३३	१३१/२४/१ पै.	३२६.००
३४	१३१/२४/२ पै.	८५.००
३५	१३१/२५ पै.	३०३३,००
३६	१३१/२६ पै.	४५१.००
३७	१३४/१/बी पै.	२७७३.००
३८	१३४/१/बी पै.	२१५०.००
३९	१३४/४/२ पै.	९०.००
४०	१३६/२/१ पै.	१०४.००
४१	१३७/२ पै.	१९४८.००
४२	१४६ पै.	६८.००
४३	११७/१९ पै.	२८४९.००
४४	११७/२० पै.	३४४०.००
४५	११७/२१/१ पै.	१४७५.००
४६	११७/२४ पै.	३७३.००
४७	११७/२६ पै.	१७४.००
४८	११७/२९ पै.	१५५६.००
४९	११७/३० पै.	१६८६.००
५०	११७/३११ पै.	२२०१.००
५१	११९/१४ पै.	७४१.००
५२	११९/१८ पै.	१०१०३.००
५३	११९/२१ पै.	२८९.००
५४	११९/२२ पै.	८३७९.००
५५	११९/२३ पै.	१११३.००
५६	११९/२४ पै.	१००२.००
५७	११९/२५ पै.	११३७.००
५८	११९/२६ पै.	५५६०.००
५९	११९/२७ पै.	३१.००
६०	११९/२९ पै.	१७३६.००
६१	११९/३२ पै.	४१९.००
६२	१२८/१४ पै.	९४२.००
६३	१२८/१२ पै.	८७८.००

एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामधून मौजे वारदोली, व भेरले ता. पनवेल, जि. रायगड येथील अंतर्भूत करण्यात आलेल्या जमिनींचा तपशील		
मौजे वारदोली		
अ.क्र.	**सर्व्हे / हिस्सा नं.**	**क्षेत्र (चौ.मी.)**
६४	१२८/१३ पै.	४३६०.००
६५	१२८/१६ पै.	७२१८.००
६६	१२८/१७ पै.	३८.००
६७	१२८/१९ पै.	२४३१.००
६८	१२८/२१ पै.	२१७.००
६९	१३१/१० पै.	२५९.००
७०	१३१/११ पै.	२२१.००
७१	१३१/१२ पै.	५५२.००
७२	१३१/१३ पै.	३३७.००
७३	४०/४	२२५०.००
७४	१२१/०	१३१०.००
७५	१२२/६ पै.	६५०.००
७६	६९/६/बी पै.	१०८८०.००
७७	१२६/०	७५५.००
७8	१२७/० पै.	२६.००
७९	१२८/७ पै.	३२८.००
८०	१२८/११ पै.	२८१७.००
८१	१२८/२० पै.	६५६६.००
८२	१३४/१/बी पै.	९५८.००
८३	१३४/१/सी पै.	२०६५.००
(अ) मौजे वारदोली येथील वगळण्यात आलेले एकूण क्षेत्र		**अंदाजे १५१९३०.०० चौ.मी.**

मौजे भेरले

अ.क्र.	**सर्व्हे / हिस्सा नं.**	**क्षेत्र (चौ.मी.)**
१	२२/१/१ पै.	१५२६.००
२	२२/१/२ पै.	८७८.००
३	२२/३ पै.	३५७.००
४	२४/२ पै.	३४१०.००
५	२५/१ पै.	३१७.००
६	३३/१/१ पै.	२२९१.००
७	३६/१ पै.	६३.००

८	३६/२ पै.	२०९८.००
९	३७/२ पै.	५२७.००
(ब) मौजे भेरले येथील वगळण्यात आलेले क्षेत्र		**अंदाजे ११४६७.०० चौ.मी.**
एकूण क्षेत्र (अ +ब)		**अंदाजे १६३३९७.०० चौ.मी. १६-३३-९७ हे.आर.**

अनुसूची—क

शासन अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२२५/९७०/प्र.क्र.१०६/२५/नवि-१२, दिनांक १० जून २०२६ सोबतचे सहपत्र.

The revised total area of the Integrated Township Project		
Sr. No.	**Government / Director of Town Planning, Maharashtra State, Pune Notification No. and Date**	**Area (Ha. Are)**
1.	Area of Integrated Township Project for which Locational Clearance granted by the Government *vide* Notification No. TPS-1714/451/C.R. 70/15/UD-12, dated 2nd December 2015.	57.454
2.	Area added by the Director of Town Planning, Maharashtra State, Pune in the Integrated Township Project *vide* Notification No. Naina/Mouje-Vardoli, Tal. Panvel/ITP/CR-64/21/TPV-3/514, dated 27th January 2022.	2,588
3.	Area added by the Director of Town Planning, Maharashtra State, Pune in the Integrated Township Project *vide* Notification No. Naina/Mouje-Vardoli, Tal. Panvel/ITP/CR-64/21/TPV-3/2474, dated 12th May 2022.	26.132
4.	Area added by Government *vide* this Notification	6.486
5.	Area added by Government *vide* this Notification	16.3397
The total revised area of Integrated Township Project for which Locatioal Clearance granted *vide* this notification [(1+2+3+4)-(5)]		**Approx. 76.3210 Ha. Are.**

४. सदर अधिसूचना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

५. सदरची अधिसूचना ही शासनाच्या *www.maharashtra.gov.in.* (कायदे व नियम) या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

निर्मलकुमार चौधरी,
शासनाचे उप सचिव.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, date 10th June 2026

NOTIFICATION

MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS-1225/970/CR-106/25/UD-12.—Whereas, the Government of Maharashtra of Maharashtra in Urban Development Department, in exercise of powers conferred under clause (b) of Sub-section *(1)* of the Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act ") declared by Notification No. TPS -1712/475/CR-98/12/UD-12, dated 10th January 2013 (hereinafter referred to as " the said Notification ") City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (being a company owned and controlled by the Government of Maharashtra) (hereinafter referred to as " the said Corporation ") as Special Planning Authority (hereinafter referred to as "the said Special Planning Authority ") for Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) (hereinafter referred to as " the said notified area ") as specified therein ;

And whereas, in accordance with sub-section (*1*) of Section 31 of the said Act, the Government of Maharashtra in Urban Development Department, vide notification No.TPS-1215/245/CR332/16/ UD-12, dated 27th April 2017, has sanctioned the Development Plan of the 23 villages of the said notified area, which has come into force with effect from 4th May 2017 ;

And whereas, in accordance with sub-section (*1*) of Section 31 of the said Act, the Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* notification No. TPS-1717/2750/CR.91/19/ UD-12, dated 16th September 2019 has sanctioned the draft Development Plan of the remaining 152 villages of the said notified area, including the Development Control Regulations which has come into force with effect from 18th October 2019 ;

And whereas, as per the directives under section 154 of the said Act, the Government in Urban Development Department, *vide* its directives bearing No. TPS-1717/2750/CR-91/19/UD-12, dated 6th January 2020 has been made applicable Development Control and Promotion Regulations (hereinafter referred to as 'the said Development Control Regulations') of the 152 villages for 23 villages of the said notified area of the said Authority ;

And whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department *vide* Notification No. TPS-1816/C.R.368/16/(Part-1)/DP-ITP/ UD-13, dated 8th March 2019 has sanctioned the Regulations for Development of Integrated Township Project for the area under Special Planning Authority under the provision of sub-section (*1AA*)(*c*) of the section 37 of the said Act, (hereinafter referred to as ' the Regulation ') ;

And whereas, after considering the request of M/s. Wadhava Construction and Infrastructure Pvt. Ltd., (hereinafter referred to as ' the said Project Proponant ') Government of Maharashtra in Urban Development Department *vide* Notification No. TPS-1714/451/C.R.70/15/UD-12, dated 2nd December, 2015, has declared a project of an area admeasuring approx. 57.454 Ha. Are. from villages Vardoli, Tal. Panvel, Dist. Raigad, more specifically described in Schedule-A attached with the notification, be a ' Special Township Project ' and granted Locational Clearance to the same, subject to terms and conditions metioned therein (hereinafter referred to as " the said Notified Special Township Project ") ;

And whereas, the said notified Special Township Project area is within the limits of Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) of the said Special Planning Authority and the said Special Planning Authority *vid*e letter No.162, dated 20th May 2019 has sanctioned revised master plan of the said notified area as Integrated Township Project with certain terms and conditions (hereinafter referred to as ' the said Notified Integrated Township Project ') ;

And whereas, the said Development Control Regulations includes the regulation for the Development of Integrated Township Project (hereinafter referred to as ' the said Regulations for the Integrated Township Project) ;

And whereas, as per the provisions of Regulation No. 4.5 of the said Regulations for the Integrated Township Project, the additional area admeasuring 2.589 Ha. from village Vardoli, Tal. Panvel, Dist. Raigad submitted by the said Project Proponant, has been approved by the Director of Town Planning, Maharashtra State, Pune *vide* it's Notification No. Naina/Mouje-Vardoli, Tal. Panvel/ITP/CR-64/21/TPV-3/514, dated 27th January 2022 to implement the Integrated Township Project by including the additional land of the area in said project area ;

And whereas, as per the provisions of Regulation No. 4.5 of the said Regulations for the Integrated Township Project, the additional area admeasuring 26.132 Ha. from village Vardoli and Bherle, Tal. Panvel, Dist. Raigad submitted by the said Project Proponant, has been approved by the Director of Town Planning, Maharashtra State, Pune *vide* it's Notification No. Naina/Mouje-Vardoli, Tal. Panvel/ITP/CR-64/21/TPV-3/2474, dated 12th May 2022 to implement the Integrated Township Project by including the additional land of the area in said project area ;

And whereas, the Government of Maharashtra has sanctioned the Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) for all the regional plans and planning authorities of the State excluding some planning authority areas under the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 *vi*de Notification No. TPS-1818/CR-236/18/D.P.&R.P./section 37(*1AA*) (*c*) & section 20*(4)*/UD-13, dated 2nd December 2020 which has come into force with effect from 3rd December 2020 (hereinafter referred to as 'the said UDCPR) ;

And whereas, Regulation No. 14.1 in Chapter-14-Special Schemes of the said UDCPR is regarding the Development of Integrated Township Projects and Government in Urban Development Department under section 37(*1AA*)(*c*) and section 20*(4)* of the said Act, *vid*e Notification No. TPS-1821/452/CR-105/2022/(Pat-2)/UD-13, dated 5th September, 2024 has sanctioned modification and the said regulations are applicable for the said Special Planning Authority area (hereinafter referred to as ' the said Regulations ') ;

And whereas, the said Project Proponant, now has requested the Government *vide* its letter dated 20th September 2024 and letter dated 11th August, 2025 to exclude an area of unbuildable pockets & area under the reservation of Development Plan Road total admeasuring about 16.284 Ha. from the said Integrated Township Project area and to include additional land total admeasuring about 6.49 Ha. in the said Integrated Township Project ;

And whereas, as per the said Development Plan the land requested for addition in the said Integrated Township Project are included in Predominent Residential Zone and partly affected by Site No. 363-Electric Sub station and 36.00 mt. wide and 24.00 mt. wide Development Plan Road ;

And whereas, the High Power Committee constituted by the Government as per the Clause 14.1.1.4(ii) of the said Regulations, for the scrutiny, monitoring, promotions, transitions and review of Integrated Township Projects has apporved the request of the said Project Proponant for addition and deletion of land parcels in the meeting held on dated 30th September 2024 and dated 4th September 2025 ;

And whereas, as per the Regulation No. 14.1.1.4(v) of the said Regulations for the Integrated Township Project, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune may grant any adjacent land to add or delete any area of the project not exceeding 50% of the total area of Integrated Township Project under Locational Clearance granted by the Government and as per the Clause 4.5 of the then said Regulation of the Integrated Township Project, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune has already added upto 50% of the total area of the Integrated Township project for which Government has granted Locational Clearance *vide* dated 2nd December 2015 ;

And whereas, the said Project Proponant, through the Assistant Director of Town Planning, Raigad, vide Challan No. MH003003874202627M, dated 26th May 2026, has deposited an amount of Rs. 1,95,500/- (Rs.One Lakh Ninety Five Thousand Five Hundred only) as a Processing Fee, as prescribed in the Regulation No. 14.1.1.4(i)(i) of the said Regulations for Integrated Township Projects, for the lands those are being added and deleted through this notification ;

And whereas, it is accordingly expedient to designate the area of the said additional land to be incorporated on map of the said Development Plan under the provisions of (2) of section 44 of the said Act, as the additional project area for the said notified Integrated Township Project and to revise the boundary of the Integrated Township Project by deleting the area ;

Now therefore, without prejudice to the provisions of the said Act, and in exercise of the powers conferred under section 44*(2)* of the said Act, the Government hereby, declares an area admeasuring 6.48-60 Ha. of village Vardoli, Tal. Panvel, Dist. Raigad more specifically described in the Schedule-A appended hereto, be an Integrated Township Project by including the same in the Integrated Township Project & deletes an area admeasuring 16.33-97 Ha. of village Vardoli & Bherle, Tal. Panvel, Dist. Raigad more specifically described in the Schedule-B appended hereto and grants Locational Clearance subject to terms and as mentioned below :—

Terms and conditions :—

(1) Regarding Ownership :—

(1) Ownership / Development Rights of said additional lands together with the area under the said notified Integrated Township Project shall be with the said Project Proponent. While applying for Letter of Intent, it is obligatory on the said Project Proponent to submit to the concerned authority the extracts of original certified documents of the registered Memorandum of Understanding, registered documents of joint venture, original measurement plans, documents proving the ownership rights, development rights & corrected 7/12 extracts of concerned lands.

(2) Part area of lands shall be included in the notified Integrated Township Project after obtaining measurement plan issued by the Deputy Superintendent of Land Records. If such lands are not remain contagious with the lands under the said Project, then area of land stand deleted from the notified Integrated Township project area.

(3) Collector, Raigad should take appropriate action regarding New Tenure" lands if any included in the said notified Integrated Township Project before granting final sanction to the Master Lay-out Plan.

(4) Collector, Raigad shall verify and take appropriate action in respect of lands which are included in the said notified Integrated Township Project having entries regarding bank encumbrances and names in the Other Right's column of 7/12 extract, if any, before granting final sanction to the Master Lay-out Plan.

(5) If any document of ownership of lands included in the area of the said notified Integrated Township Project, is found false in future or if any judicial proceedings arise regarding the said notified Integrated Township Project in future then, it shall be the sole responsibility of the said Project Proponent to deal with those proceedings at his risk and cost. In such case Locational Clearance granted shall be deemed to be cancelled for that lands.

(6) The Project Proponant shall submit the certificate from the concern forest officer as per clause No. 14.1.1.4(i) (f), certificate from the Director of Archeological Department as per clause no. 14.1.1.4(i)(h) and no objection certificate from the Water Resorces Department as per clause no. 14.1.1.4(i)(d) in respect of the additional land added in the said Integrated Township Project before obtaining letter of intent for Collector, Raigad.

(II) Conditions regarding Environment and Others :—

